# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 09 November 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अकोला इथं जाहीर सभा थोड्याच वेळात होणार आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट पोलिस बंदोबस्त करण्यात आला आहे.

या सभेला शिवसेना नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आदी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, अकोला इथल्या सभेनंतर पंतप्रधान मोदी यांची नांदेड इथंही दुपारी बारा वाजता जाहीर सभा होणार आहे. नांदेडमध्ये खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीत आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी आता अवघे दहा दिवसच शिल्लक राहिलेले असतांना सर्वच पक्षांनी आपला प्रचार जोमाने सुरु केला आहे. राज्यातील २८८ जागांसाठी २० नोव्हेंबरला मतदान होत असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. दरम्यान आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजीत पवार पुणे, सांगली आणि सतारा इथं प्रचार करणार आहेत तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे नागपुर इथं प्रचारसभेला संबोधित करतील. राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार बीड इथं प्रचारात सहभागी होतील. यासह अन्य पक्षांचे नेतेही आज राज्यभरात विविध ठिकाणी प्रचार करत आहेत. तर दुसरीकडं निवडणूक कार्यक्रमात नियुक्त कर्मचारी आपल्या निर्धारित विभागांमधून मतदार पावत्यांच्या

वितरणात तसंच तपासणी पथकांच्या माध्यमातून एकंदर निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाले आहेत.

****

विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी घरुन मतदान करण्यास सुरुवात झाली आहे. हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात आज अठरा पथकांमार्फत ज्येष्ठ मतदारांच्या घरी जाऊन मतदान करून घेण्याची प्रक्रीया सुरु आहे.

****

नाशिक जिल्ह्यात काल पहिल्या दिवशी सुमारे शंभरहुन अधिक ज्येष्ठ नागरिकांनी मतदान केलं. यात काही दिव्यांगांचा समावेश आहे. नाशिक जिल्ह्यात १५ मतदारसंघात ६० हजार २७८ ज्येष्ठ मतदार आहेत, तर २३ हजार ५४८ इतके दिव्यांग मतदार आहेत. यातील एक हजार ८८४ मतदार घरून मतदान करण्यास इच्छुक आहेत. येत्या सहा दिवसांत निवडणुकीचे काम करणारे कर्मचारी त्यांच्या घरी जाऊन मतदान करून घेणार आहेत. जळगाव जिल्ह्यातील अकरा मतदारसंघात आतापर्यंत चारशे पेक्षा अधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून १७ नोव्हेंबरपर्यंत गृह मतदान प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

****

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड- देवळा विधानसभा मतदारसंघातील भाजपचे बंडखोर माजी जिल्हाध्यक्ष केदा आहेर आणि आत्माराम कुंभार्डे या दोघांची पक्षशिस्तीचा भंग केल्यामुळं भाजपमधून हकालपट्टी करण्यात आली आहे. यापूर्वी भाजपनं मालेगाव बाह्य मधील बंडखोर कुणाल सूर्यवंशी बागलाणमधील आकाश साळुंखे आणि जयश्री गरुड या तिघांची हकलपट्टी केली होती.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा उद्या १० नोव्हेंबरला होत असून, बीड इथल्या १६ परीक्षा केंद्रांवर ही परिक्षा होत आहे.

मागील परीक्षा काळातले गैरप्रकार टाळण्यासाठी परीक्षा परिषदेनं यावेळी चोख नियोजन केलं आहे.

****

कोल्हापूरच्या करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवाला काल  प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मावळत्या सूर्याची किरणं देवीचे चरणस्पर्श करुन थोडीवर सरकत लुप्त झाली. हा अनोखा सोहळा सूर्यास्तापूर्वी काही क्षण अनुभवता येतो. सूर्य किरणं आज दुसऱ्या दिवशी मुर्तीच्या अंगावर आणि उद्या तिसऱ्या दिवशी मुखकमलाला स्पर्श करतील. किरणोत्सवासाठी भाविक–पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

****

नांदेड – मुंबई – नांदेड या रेल्वे गाडीच्या दोन विशेष फेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. नांदेडहून ही रेल्वे उद्या दहा नोव्हेंबरला रात्री अकरा वाजता निघून परवा ११ नोव्हेंबरला मुंबईला दुपारी अडीच वाजता पोहोचेल. परतीच्या प्रवासात ही गाडी मुंबईहून अकरा नोव्हेंबरलाच दुपारी साडेतीन वाजता निघून बारा नोव्हेंबरला सकाळी सव्वासहा वाजता नांदेड इथं पोहचेल. दरम्यान, अदिलाबाद–नांदेड इंटरसीटी एक्सप्रेस आजच्या दिवसासाठी मुदखेड ते नांदेडदरम्यान अंशत: रद्द करण्यात आली आहे. सुधारीत वेळेनुसार ही गाडी आज सकाळी आठऐवजी दहा वाजता आदिलाबादहून निघाली आहे.

****

राज्यात दिवाळीनंतर हळूहळू थंडीची चाहूल लागत आहे. काही भागांमध्ये मागील २४ तासांत किमान तापमान १५ अंशांच्या खाली नोंदवलं गेलं. नाशिक इथं सर्वात कमी १४ पूर्णांक ६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे.

****

यजमान, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चार टी–ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत काल झालेला पहिला सामना भारतानं जिंकला. मालिकेत दुसरा सामना उद्या भारतीय वेळेनुसार, संध्याकाळी साडेसात वाजता खेळला जाईल.

****